सेन्सेक्स: ८१,११८.६०
▼५७३.३८ (-०.७०%)

निफ्टी: २४,७१८.६०
▼१६९.६० (-०.६७%)

तेल $: ७४.५२ (▲७.४४%)

डॉलर ₹: ८६.११ (▲५९ पैसे)

सोने, खनिज तेल उच्चांकाला

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : इस्रायलने इराणवर हवाई हल्ला केल्याचे विपरित परिणाम शुक्रवारी भारतीय बाजारातही दिसून आले. वस्तू वायदे बाजारात सोन्याने प्रति १० ग्रॅममागे प्रथमच १ लाख रुपयांपुढील पातळी गाठली, तर खनिज तेलाच्या वायदे किमतीही सार्वकालिक उच्चांकी पातळीवर पोहोचल्या. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत ५९ पैशांनी कमकुवत बनलेल्या रुपयाने या तेजीला आणखी इंधन पुरविले.

इस्रायलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तरासाठी इराणने सुरू केलेल्या हालचाली आणि दक्षिण-आशियातील युद्ध भडक्याने तेल पुरवठ्यात व्यत्यय येण्याची चिंतेतून संपूर्ण जगभरात वस्तू आणि भांडवली बाजारात शुक्रवारी भीतीदायी पडसाद उमटले. भारतात मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर (एमसीएक्स) सोन्याचा भाव शुक्रवारी सलग तिसऱ्या सत्रात वाढला. सकाळी सत्राच्या सुरुवातीलाच २,०११ रुपयांच्या वाढीसह, सोने प्रति १० ग्रॅमसाठी १,००,४०३ रुपयांच्या अभूतपूर्व उच्चांकावर पोहोचले. एमसीएक्सवर, ऑगस्टसाठी सर्वाधिक व्यापार झालेले करार सोन्याचेच होते.

इस्रायल-इराण संघर्षामुळे गुंतवणुकीचे सुरक्षित ठिकाण म्हणून सोन्याच्या मागणीतील वाढ आणि अमेरिकी डॉलरच्या मजबूतीमुळे 'एमसीएक्स'वर सोन्याच्या किमती नवीन उच्चांकावर पोहोचल्या, असे 'बॉम्बे बुलियन मेटल हब एलएलपी'चे संचालक मृणेश जैन म्हणाले. रुपयाचे अवमूल्यन झाल्यामुळे आयात केलेले सोने महाग झाले आहे, ज्यामुळे देशांतर्गत किमती आणखी वाढल्या आहेत. सोन्याबरोबरीनेच चांदीतही शुक्रवारच्या सत्रात वाढ दिसून आली. एमसीएक्सवर सकाळच्या सत्रात चांदीमध्ये ०.७ टक्क्यांची वाढ होऊन, त्यात किलोमागे १,०६,६५७ रुपये पातळीवर व्यवहार होताना दिसून आले.

> खनिज तेलाच्या किमती चिंतेचा विषय बनला असून, त्यातील पिंपामागे १० डॉलरच्या वाढीच्या परिणामी देशाची व्यापार तूट १२ अब्ज डॉलरने आणि ३ टक्क्यांखाली ओसरलेल्या किरकोळ महागाई दरातही अर्धा टक्क्यांची वाढ संभवते.
> - **अनिल कुमार भन्साळी**, कार्यकारी संचालक, फिनरेक्स ट्रेझरी ॲडव्हायजर्स

भारतीय कंपन्यांचा एकत्रित नफा १७ वर्षांच्या उच्चांकी

नफा-जीडीपी गुणोत्तर ४.७ टक्क्यांवर

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

सरलेल्या २०२४-२५ आर्थिक वर्षात भारतीय कंपन्यांचा एकत्रित नफ्याने महत्त्वाचा टप्पा गाठत १७ वर्षांच्या उच्चांकी पातळीवर मजल मारली आहे. निफ्टीमधील आघाडीच्या ५०० कंपन्यांचा नफा ते सकल देशांतर्गत उत्पादनाचे (प्रॉफिट टू जीडीपी) गुणोत्तर हे ४.७ टक्के नोंदवले गेले आहे, असे मोतीलाल ओसवालने शुक्रवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालाने पुढे आणले.

देशांतर्गत भांडवली बाजारात सूचिबद्ध कंपन्यांसाठी नफा ते जीडीपी गुणोत्तर हे ५.१ टक्क्यांहून अधिक असे १४ वर्षांचा उच्चांक गाठणारे आहे. अनेक प्रमुख क्षेत्रांमधील कंपन्यांच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे नफा-जीडीपी गुणोत्तर वाढत आहे. गेल्या सात वर्षांपासून नकारात्मक योगदान देणारे दूरसंचार क्षेत्र हे सरलेल्या वर्षात सकारात्मक बनले. या वाढीस कारणीभूत ठरणाऱ्या इतर क्षेत्रांमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँका (ज्यांनी गुणोत्तरात ०.०७ टक्के भर घातली), आरोग्यसेवा (०.०४ टक्के), ग्राहक (०.०४ टक्के), धातू (०.०३ टक्के) आणि पायाभूत सुविधा (०.२ टक्के) यांचा समावेश आहे.

रुपया ५९ पैशांनी कमकुवत

मुंबई: तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमतीतील वाढ आणि अमेरिकी चलन मजबूत झाल्यामुळे शुक्रवारी डॉलरच्या तुलनेत रुपया ५९ पैशांनी घसरून ८६.११ वर बंद झाला. आंतरबँक परकीय चलन बाजारात, रुपया डॉलरच्या तुलनेत ७३ पैशांच्या पडझडीने ८६.२५ च्या नीचांकावर खुला झाला. रुपयाला सावरण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून हस्तक्षेप केला गेल्याचे व्यापाऱ्यांचे मत आहे. त्यामुळे तो तात्पुरता ८५.९२ या दिवसांतील उच्चांकी पातळीवर परतला. परंतु देशांतर्गत भांडवली बाजारातील नकारात्मकता आणि परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी समभाग विकून बाहेर पडण्याचा सपाटा सुरू केल्याने रुपयातील घसरणीला आणखी हातभार लागला.

परकीय गंगाजळी ७०० अब्ज डॉलरच्या नजीक

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: भारताची परकीय चलन गंगाजळी ६ जून रोजी समाप्त आठवड्यात ५.१७ अब्ज डॉलरने वधारून ६९६.६५ अब्ज डॉलरवर पोहोचली, असे रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी जाहीर केले. त्याआधीच्या म्हणजेच ३० मे रोजी संपलेल्या आठवड्यात एकूण परकीय चलन साठा १.२३ अब्ज डॉलरने घसरून ६९१.४८५ अब्ज डॉलरवर होता. तर सप्टेंबर २०२४ अखेर परकीय चलन साठा ७०४.८५ अब्ज डॉलरच्या सर्वोच्च पातळीवर होता.

'सेन्सेक्स'वर ५७३ अंश घसरणीचा घाव

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: इराण-इस्रायल दरम्यान वाढलेला तणाव आणि त्यापरिणामी खनिज तेलाचे दर भडकल्याने जगभरातील गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरणाचे नकारात्मक प्रतिबिंब देशांतर्गत बाजारातही शुक्रवारी उमटले. परिणामी सेन्सेक्स आणि निफ्टी हे प्रमुख निर्देशांक सुमारे १ टक्क्यांनी घसरले. सलग दुसऱ्या सत्रातील मोठ्या घसरणीने, दोन दिवसांत गुंतवणूकदारांची ८.३५ लाख कोटींची मत्ता लयाला गेली आहे. सप्ताहअखेरच्या व्यवहारात सेन्सेक्स ५७३.३८ अंश गमावून ८१,११८.६० पातळीवर स्थिरावला. दुसरीकडे राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीमध्ये १६९.६० अंशांची घसरण झाली आणि तो दिवसअखेर २४,७१८.६० पातळीवर बंद झाला.

बँकप्रमुखांबरोबर अर्थमंत्र्यांची २७ जूनला बैठक

पीटीआय, नवी दिल्ली

रिझर्व्ह बँकेने व्याजदरात केलेल्या आक्रमक कपातीनंतर, येत्या २७ जूनला अर्थमंत्री निर्मला सीतारामन सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या प्रमुखांशी संवाद साधणार आहेत. या बैठकीत अर्थव्यवस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या विविध योजनांच्या कामगिरीच्या आढाव्याबरोबरच बँकांकडून उद्योगांसाठी वितरित होत असलेल्या पतपुरवठ्याची अर्थमंत्री माहिती घेणार आहेत.

रिझर्व्ह बँकेने गेल्या आठवड्यात ६ जूनला रेपो दरात अर्धा टक्क्यांची कपात केली. याबरोबरच अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि बँकांना पतपुरवठ्यासाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा म्हणून रोख राखीव प्रमाण अर्थात सीआरआरमध्ये अनपेक्षितरित्या मोठी कपात केली गेली. त्यानंतर अर्थमंत्र्यांकडून ही पहिलीच आढावा बैठक होत आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अर्थमंत्री सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या आर्थिक कामगिरीचा आणि चालू आर्थिक वर्षातील त्यांच्या उद्दिष्टांचा आढावा घेतील. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये विकास दर ६.५ टक्के असा चार वर्षांच्या नीचांकी पातळीवर रोडावल्याने, आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी बँकांनी उत्पादक क्षेत्रांना अधिक कर्ज देण्याचे आवाहन अर्थमंत्र्यांकडून केले जाऊ शकेल.

सरकारी बँकांना १.७८ लाख कोटींचा विक्रमी नफा

मार्च २०२५ अखेर सरलेल्या आर्थिक वर्षात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा (पीएसबी) एकत्रित नफा १.७८ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला आहे, जो मागील वर्षाच्या तुलनेत २६ टक्क्यांनी वधारला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील सर्व १२ बँकांनी आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण १.४१ लाख कोटी रुपयांचा नफा कमावला होता. यामुळे सरलेल्या आर्थिक वर्षात त्यात थेट ३७,१०० कोटी रुपयांनी वाढ झाली आहे.

कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन कस समृद्ध!

रजिस्टर्ड ऑफिस : 'कॉसमॉस टॉवर', प्लॉट नं. ६, आयसीएस कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, शिवाजीनगर, पुणे-४११००७.
फोन : ०२०-६७०८६७०८

सूचना

कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि., **एक्सर रोड, बोरीवली पश्चिम शाखा** आपल्या सन्माननीय ग्राहकांच्या अधिक चांगल्या सोयीसाठी नजीकच्या काळात नवीन जागेत **स्थलांतरित होत आहे.**

सध्याचा पत्ता	नवीन पत्ता
शॉप नं. ३ आणि ४, तळमजला, फ्लॅट नं. ए-५, पहिला मजला, अक्षर अपार्टमेंट को-ऑप हौसिंग सोसायटी लि., एक्सर रोड, बोरीवली पश्चिम, मुंबई - ४०००९२	तळमजला, हिनल पार्क, योगीनगर, एक्सर रोड, बोरीवली पश्चिम, मुंबई - ४०००९२

आम्ही आपणांस सर्वोत्तम सेवांचे आश्वासन देतो.

दिनांक : १३/०६/२०२५ सही/-
स्थळ: पुणे व्यवस्थापकीय संचालिका

मध्य रेल्वे

सार्वजनिक सूचना

दिनांक 09.06.2025 रोजी सकाळी 09 वाजून 01 मिनिटाच्या सुमारास, अप गाडी क्र. एन/20 (कसारा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस फास्ट लोकल) आणि डाऊन गाडी क्र. एस/11 (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कर्जत फास्ट लोकल) या दोन्ही ट्रेन अनुक्रमे अप थ्रू आणि डाऊन थ्रू मार्गावरून जात असताना दिवा व मुंब्रा स्थानकाच्या विद्युत खांब क्र. 40/405 व 40/401 दरम्यान दोन्ही गाडीच्या दारात उभे असलेल्या प्रवाशांपैकी आठ प्रवाशी खाली पडले. सदर दुर्दैवी घटनेची चौकशी रेल्वे अधिकाऱ्यांची पाच सदस्यीय समिती करत आहे.

सदर गाडीचे प्रवासी, नागरीक अथवा रेल्वे कर्मचारी या घटनेबाबत काही माहीती, पुरावे देऊ इच्छित असतील तर त्यांनी समक्ष, ई-मेल द्वारे वा लिखीत स्वरूपात स्वतःचे नाव, पत्ता, शासकीय ओळखपत्र, मोबाईल क्रमांक आणि इ-मेल पत्यासह ही सुचना प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसात समितीकडे वा खाली दिलेल्या पत्यावर वा इमेल द्वारे द्यावी.

(एस. एस. सोनवणे)
वरीष्ठ मंडळ संरक्षा अधिकारी,
मंडळ रेल्वे प्रबंधक कार्यालय,
दुसरा मजला, अनेक्स बिल्डिंग,
छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई पिनकोड 400001.
मोबाईल क्र.8828119730
ई-मेल: srdsobbcr@gmail.com

AK-175

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा

बृहन्मुंबई महानगरपालिका

प्रमुख अभियंता (यांत्रिकी आणि विद्युत) यांचे कार्यालय
१ ला मजला, वरळी अभियांत्रिकी संकुल, डॉ.ई. मोजेस रोड, वरळी नाका, वरळी, मुंबई-४०००१८.
क्र. प्र. अभि./यां. व वि./१६९१, दि. १३.०६.२०२५

ई-निविदा नोटीस

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून खालील नमूद कामांसाठी पात्र बोलीदारांकडून 'आयटेम रेट बेसीस'वर ई-निविदा मागविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'निविदा' विभागांतर्गत तपशीलवार निविदा सूचनेमध्ये बोली सुरू करण्याची तारीख, वेळ आणि बोली समाप्तीची तारीख आणि वेळ नमूद केली आहे. ई-निविदा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पोर्टल (http://portal.mcgm.gov.in) तसेच NIC पोर्टल https://mahatenders.gov.in वर उपलब्ध आहे.

विषय	१. परळ येथील के.ई.एम. रुग्णालयातील वैद्यकीय महाविद्यालय (ग्रंथालय आणि वसतीगृह) नवीन तसेच जुनी इमारत येथे सुरक्षिततेसंबंधीची कामे. 2025_MCGM_1189535_1 २. डॉ.आर.एन.कुपर रुग्णालय, विलेपार्ले (पश्चिम) मुंबई येथे सुरक्षा कामांचे अद्ययावतीकरण. 2025_MCGM_1189576_1 ३. श्री. चिमणलाल मेहता इमारत, बोरिवली (पश्चिम), मुंबई येथे सुरक्षा कामांचे अद्ययावतीकरण. 2025_MCGM_1189588_1
निविदा विक्री : (Tender Sale)	१. दिनांक १४.०६.२०२५ सकाळी ११.०० ते दि. ०४.०७.२०२५ सायं. ४.०० पर्यंत २. दिनांक १४.०६.२०२५ सकाळी ११.०० ते दि. ०४.०७.२०२५ सायं. ४.०० पर्यंत ३. दिनांक १४.०६.२०२५ सकाळी ११.०० ते दि. २०.०६.२०२५ सायं. ४.०० पर्यंत
पूर्व निविदा बोली बैठक	१. दिनांक १९.०६.२०२५ सकाळी ११.०० वाजता. २. दिनांक १९.०६.२०२५ दुपारी १२.०० वाजता. ३. लागू नाही.
वेबसाइट :	http://portal.mcgm.gov.in
लीगल/ट्रेड नाव : जीएसटीआयएन क्र.	बृहन्मुंबई महानगरपालिका 27AAALM0042L3Z4.
संपर्क : अ) नाव ब) दूरध्वनी क्र. क) भ्रमणध्वनी क्र. ड) ई-मेल	कार्यकारी अभियंता यां. (वि.प्र.) बांधकामे श्री. मनोज ह. वानखेडे २४९५८१५३ ९६३७३४१००४ eemecheiconst.me@mcgm.gov.in

उपरोक्त नमूद निविदांच्या अधिक तपशिलासाठी इच्छुक निविदाकारांनी http://portal.mcgm.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी.

निविदा संदर्भातील कागदपत्रे पोस्टाने जारी किंवा प्राप्त होणार नाहीत.

पीआरओ/६८१/एडीव्ही/२०२५-२६ सही/-

स्वमर्जीने औषधोपचार करू नका. **कार्य. अभियंता यां. (वि.प्र.) बांधकामे**

नवी मुंबई महानगरपालिका

उद्यान विभाग

फेर निविदा सुचना क्र. नमुंमपा/निविदा/उद्यान/ब-1/04/2025-26

शुध्दीपत्रक

मोरबे धरण क्षेत्रात लागवड केलेल्या वृक्षांचे पुढील चार वर्षे संवर्धन व संरक्षण करणे या कामाची निविदा भरणे (Upload) व निविदा उघडणे यामध्ये काही तांत्रिक अडचणीमुळे खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे

तपशील	मुळ निविदेतील दिनांक व कालावधी	सुधारित दिनांक व कालावधी
निविदा भरणे (Upload) कालावधी	दि.12/6/2025 रोजी दु.1.00 वाजता	दि. 19/6/2025 रोजी दु. 4.00 वाजता
ई-निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ	दि. 13/6/2025 रोजी दु. 4.00 वाजता	दि. 20/6/2025 रोजी दु. 4.00 वाजता

संबंधीत निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
उप आयुक्त (उद्यान परि-1)
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/196/2025

Canara Bank

स्ट्रेस्ड ॲसेट्स मॅनेजमेन्ट ब्रँच : सर्कल ऑफिस बिल्डिंग, 'बी' विंग, ८वा मजला, सी-१४, जी-ब्लॉक, बीकेसी, बांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१ । **ई-मेल :** cb15550@canarabank.com

स्वीस चॅलेंज प्रोसेसअंतर्गत सहभागी होऊन परवानगी असलेल्या संस्थांकरिता करंजा टर्मिनल ॲण्ड लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेड (''केटीएलपीएल'')च्या स्ट्रेस्ड लोन एक्स्पोजरच्या हस्तांतरणासंबंधित स्वारस्याची अभिव्यक्ती (''ईओआय'') मागविणारी जाहिरात

कॅनरा बँक (**''सीबी''**), कॅनरा बँक, बँक ऑफ बडोदा व पंजाब ॲण्ड सिंध बँक (एकत्रीतरित्या **''धनको''** किंवा **''कन्सोर्टियम धनको''**) समाविष्ट धनकोंच्या कन्सोर्टियमच्या वतीने भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा (**''आरबीआय''**) निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूत्रे तसेच लागू कायद्यांतर्गत पात्र/ अनुमती दिलेल्या एआरसी'ज/ बँक्स/ एनबीएफसी'ज/ ऑल इंडिया फायनान्शियल इन्स्टिट्यूशन्स किंवा अन्य कोणतीही हस्तांतरिती (एकत्रीतरित्या **''अनुमती दिलेल्या संस्था''** किंवा **''बोलीदार''**), समाविष्ट मास्टर डायरेक्शन- भारतीय रिझर्व्ह बँक (कर्ज एक्स्पोजरचे हस्तांतरण) निदेश, २०२१, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार (**''आरबीआय मास्टर डायरेक्शन्स''**) आणि प्रत्येक धनको इन्टर्नल बोर्ड मान्यताप्राप्त पॉलिसी याच्याकडून स्वारस्याची अभिव्यक्ती मागवीत आहेत. धनको काटेकोरपणे **''जसे आहे जेथे आहे''**, **''जसे आहे जे काही आहे''**, **''जे काही आहे जसे आहे''**, **''जे काही आहे तेथे आहे''** आणि **''कोणत्याही आधाराशिवाय''** ऑनलाइन ई-लिलावाद्वारा स्वीच चॅलेंज मेथड (**''एससीएम''**)मार्फत बोली प्रोसेस डॉक्युमेन्टनुसार (**''बीपीडी''**) प्रक्रियेचे अनुसरण करून मूळ प्रस्तावकर्त्यांद्वारा (**''अँकर बोलीदार''**) तयार केलेल्या हाती असलेल्या विद्यमान प्रस्तावाच्या (**''अँकर बोली''**) अनुसार **''सर्व रोख''** आधारे अनुमती दिलेल्या संस्थेकरिता **रु. ५८९.५९ कोटी (रुपये पाचशे एकोणनव्वद कोटी एकोणसाठ लाख फक्त)** रक्कम असलेली निधी-आधारित मर्यादेच्या एकूण थकीत रकमेसह ''केटीएलपीएल''च्या स्ट्रेस्ड लोन एक्स्पोजरचे अभिहस्तांकन/ हस्तांतरणाचा प्रस्ताव ठेवीत आहेत. बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड (**''बीओबीसीएपी'ज''**)ची धनकोचे प्रक्रिया सल्लागार (**''पीए''**) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ऋणको/गहाणकाराचे नाव व पत्ता :	मेसर्स करंजा टर्मिनल ॲण्ड लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेड (''केटीएलपीएल'') **नोंदणीकृत कार्यालय :** ऑफिस नं. ७०५ व ७०६, ७वा मजला, शेल्टॉन कुबीक्स, चिलू पावले देवरे मार्ग, सेक्टर-१५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, ठाणे-४०० ६१४, महाराष्ट्र, भारत.
ईओआय व इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख :	१८ जून, २०२५ रोजी सायं. ५ वा.
पाहणीची तारीख :	१९ जून, २०२५ ते ०२ जुलै, २०२५ (केवळ कामकाजाच्या दिवशी) स. ११ व सायं. ५ दरम्यान.
व्हीडीआर व पूर्वतपासणीच्या प्रक्रियेकरिता शेवटची तारीख :	०२ जुलै, २०२५
अँकर बोलीदारकडील हस्ते प्रस्ताव/ राखीव किंमत :	रु. ४३०.०० कोटी (रुपये चारशे तीस कोटी फक्त)
इसारा रक्कम ठेव (इरठे) :	रु, ४३.०० कोटी (रुपये त्रेचाळीस कोटी फक्त)
अँकर बोलीच्या ५% दराने किमान मार्कअप व बोली सुरू होणारी किंमत :	रु. २१.५० कोटी (रुपये एकवीस कोटी व पन्नास लाख फक्त)
बोली सुरू होणारी किंमत :	रु. ४५१.५० कोटी (रुपये चारशे एकावन्न कोटी पन्नास लाख फक्त)
वृद्धी रक्कम (बोली पटीत) :	किमान रु. २.०० कोटी (रुपये दोन कोटी फक्त) व त्या पटीत.
ई-लिलावाची तारीख व वेळ :	०३ जुलै, २०२५ रोजी स. ११ ते दु. १.
व्यवहार अधिकारींचा तपशील :	श्री. राकेश चंद्र शांडिल्य- एजीएम व श्री. शक्ती कुमार शर्मा- मुख्य व्यवस्थापक; ई-मेल : cb15550@canarabank.com

अन्य शर्ती व अटी : बोली प्रक्रिया कागदपत्रे समाविष्ट ईओआयचा फॉर्मेट, अन्य कागदपत्रे (www.bobcaps.in) या पीए'च्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी ports@bobcaps.in यावर ई-मेलद्वारा इलेक्ट्रॉनिक प्रणालीत आणि ''के/ए श्री. सागर भद्रा, बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड, बी-१७०४, परिनी क्रेसेन्झो, 'जी' ब्लॉक, बीकेसी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१'' येथे प्रत्यक्ष स्वरूपात सादर केली पाहिजेत. सदर कागदपत्रांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख १८ जून, २०२५ रोजी सायं. ०५.०० वा.पर्यंत आहे.

आवश्यक कागदपत्रे, इरठे व धनकोंची मान्यता (जर आवश्यक असल्यास) सादरीकरणावर, सूचिबद्ध पात्र बोलीदारांना व्हर्च्युअल डेटा रूम (''व्हीडीआर'') प्राप्त करण्यास, अधिक माहिती समाविष्ट 'केटीएलपीएल'च्या खात्यात यथोचित पूर्ण-तपासणी सुरू होण्याकरिता इन्फर्मेशन मेमोरंडम (जर असल्यास) आणि त्यानंतर ०३ जुलै, २०२५ रोजी स. ११.०० वा.पासून ते ०३.०० वा.पर्यंत ई-लिलावात सहभागास अनुमती दिली जाईल.

ईओआय व बीपीडीच्या कोणत्याही शर्ती व अटी सुधारित केल्या जातील किंवा त्यात बदल केला जाईल किंवा संपूर्ण बोलीप्रक्रिया कोणतेही कारण न दाखविता धनको किंवा बीओबीसीएपीसद्वारा कोणत्याही स्तरावर संपुष्टात आणली जाईल. बोलीप्रक्रियेसंबंधित सर्व प्रमुख माहिती 'टेंडर्स' टॅबअंतर्गत पीए'च्या वेबसाइटवर उपलब्ध असणार आहे. बोली अर्जदारांनी, सर्व वेळेत, प्रक्रिया सल्लागाराच्या वेबसाइटवर अपलोड केल्यानुसार या संबंधित अद्ययावत अपडेट्स/ स्पष्टीकरणे/ सुधारणा/ वेळमर्यादा, जर असल्यास, (समाविष्ट प्रक्रिया कागदपत्रे) स्वतःला अवगत ठेवले पाहिजे. बीओबीसीएपीएस किंवा धनको सदर फेरबदलाबाबत स्वतःला अपडेटेड ठेवण्याकरिता बोली अर्जदारांच्या बाजूने कोणत्याही अपयशास पात्र असणार नाहीत. धनको कर्ज एक्स्पोजरसंबंधित कोणतेही प्रवर्तनीय, कायदेशीर किंवा कोणत्याही अन्य प्रकारची जोखीम गृहीत धरणार नाहीत.

अधिक तपशीलाकरिता संपर्क : BOBCAPS
१) श्री. सागर भद्रा - एव्हीपी; फोन : +९१ ७६६६४१२३९५;
२) श्री. जतन जोशी - एसएम; फोन : +९१ ९४२६७२६२९४;
ई-मेल : ports@bobcaps.in

बोली प्रक्रियेच्या सविस्तर शर्ती व अर्टीकरिता, कृपया https://canarabank.com/ या कॅनरा बँकेच्या वेबसाइटवर किंवा https://www.bobcaps.in/tenders या बीओबीसीएपीएसच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी :

स्थळ : मुंबई स्वाक्षरी/- श्री. राकेश चंद्र शांडिल्य - एजीएम व श्री. शक्ती कुमार शर्मा - मुख्य व्यवस्थापक
दिनांक : १४ जून, २०२५ व्यवहार अधिकारी, कॅनरा बँक

लोकसत्ता क्लासिफाइडस्
सगळ्यांकरिता सर्वकाही

पाहिजेत

महाराष्ट्र मित्र मंडळ (सं) शाळेत शिक्षक पाहिजेत. (१) माध्यमिक शाळा (अनुदानित तत्त्वावर- ४ पदे) 1) B.Sc., B.Ed. विषय-विज्ञान, गणित (ग्रुप A) SC- 01 पद, (ग्रुप A) NTC-01 पद, 2) B.A., B.Ed. विषय- इंग्रजी VJ A-01 पद, SEBC-01 पद (विनाअनुदानित तत्त्वावर- ०२ पदे) 1) B.Sc., B.Ed. विषय- विज्ञान, गणित CWS-01 पद, SEBC- 01 पद. मुलाखत दिनांक- १६/०६/२०२५. वेळ सकाळी- ९.०० ते १०.३०. (२) प्राथमिक शाळा (पवित्र पोर्टलनुसार अनुदान तत्त्वावर H.S.C., D.Ed. (TET परीक्षेस प्रावीण्य आवश्यक), मराठी व इंग्रजी माध्यमातून, SC- 03, NT-C- 01, (अनुदान तत्त्वावर) NT- D-01, SEBC-01, EWS-01, Open-01 (विनाअनुदानित तत्त्वावर) एकूण पदे- ०८- मुलाखत दिनांक- १६/०६/२०२५. वेळ- सकाळी- १०.३० ते १२.३०. (३) बालवाडी विभाग- १ पदे MS-CIT कोर्स व मॉन्टेसरी कोर्स आवश्यक. मुलाखत दिनांक- १६/०६/२०२५. वेळ- दुपारी १.०० ते १.३०. टीप- वरील अर्हताप्राप्त जातीच्या उमेदवारांनी मूळ शैक्षणिक प्रमाणपत्र, मूळ जात प्रमाणपत्र व स्वतःच्या हस्ताक्षरातील अर्जासहित मुलाखतीकरिता उपस्थित रहावे. पत्ता- एस. टी. स्टॅण्डच्या पाठीमागे, उल्हासनगर ०१. फोन नं. 0251-2564523.
0070973009-1

घाटकोपर (असल्फा) प्रिंटिंग प्रेसमध्ये 4 कलर ऑफसेटसाठी बॉयलर आणी फिडरमेन आणी हेल्पर पाहिजेत. संपर्क वेळ 11 ते 7 फोन - 9819996770/ 8500491000
0070972361-1

पॅकिंगसाठी महिला/ पुरुष कामगार पाहिजेत. वयाची अट नाही, पगार २१,०००/-, शनिवार/ रविवार सुट्टी, पिकअप ड्रॉप बस फ्री. 7700020719.
0070972401-1

मुंबई आणि भिवंडीमध्ये कुरियर ॲण्ड लॉजिस्टिक कंपनीत पाहिजेत (1) MIS Executives, (2) Operation Executives, (3) Computer Operators (4) पिकअप आणि डिलिव्हरी स्टाफ (बायकर्स), (5) ड्रायव्हर्स, (6) लोडर्स, (7) अकाऊण्टंट. संपर्क- 7410152983.
0070972370-1

Housekeeping Supervisor experience. Mumbai Central Railway office Payment 18000/- Age upto 45 years. Timing 7 - 4 morning WhatsApp biodata : 9869781781
0070973017-1

URGENTLY Require AI Artists for Instagram Profile, Age 18-21, College Students, Part Time, DM 7021753699.
0070973012-1

Required Female Teaching Staff for English Medium School Academic Year : 2025-26 Secondary Section (Science & Maths) Qualification: B.Sc. B.Ed., B.com B.Ed., D.Ed SUNGRACE ENGLISH HIGH SCHOOL & JR. COLLEGE, 1, Milind Nagar, Himalaya Society Road, Near Asalfa Metro Station, Ghatkopar (W.), Mumbai-400084. Contact: ssungraceschool@yahoo.com Mob. 9819030474
0070973054-1

Required of Ambernath (East) Experience Commercial Assistant Contact - Flameproof Instrumentation. E-14, Anand Nagar, MIDC, Near ASB Co. Ambernath (E), Mobile - 9324164455/ 9821164455.
0070972997-1

एका सुप्रसिद्ध सुरक्षा एजेंसीला दिवसपाळी व रात्रपाळीसाठी- सुरक्षा गार्डस, बाऊंसर व सुरक्षा सुपरवाईजर हे- भेंडी बाजार, मुंबई- येथील साईटवर पाहिजे आहेत. संपर्क- 9820596674/ 7021871385/ 9773882858.
0070972368-1

WALKIN @ CHEMBUR for Retired/ Seniorcitizen/ VRS/ Housewives/ Experience Staff. (Age 40+) Attractive Loyalty + Salary 10 to 20 L/Y + Free Tours. Padmakar : 9869440138
0070968291-2

पार्ट टाईम जॉब

Excellent opportunity for Retired/ VRS/ Bankers/ NRI/ Housewives. Fixed Salary+ PF+ Incentive+ Promotions+ Medical, etc. Call: 9819609515.
0070973046-1

SECOND EARNING for Retired, VRS, Bankers, Professionals, Qualified Housewives. Salary +PF +Medical cover. Age 40-65. SSC pass+ onwards. : 9324444089
0070964614-2

Intensity to Grab Opportunity, Restart Career at Flexi timings with Genuine Income+ Valuable Benefits. Only for Age: 50+. Call: 9833682433.
0070971594-1

५८ पर्यंत गव्हर्नमेंट, बँक, शाळा इथे काम केले! आता? काम/ वेळ तुमचा. कमाई+ इन्सेंटीव्ह PF+ ESIC कसे? या! फोन : 8850565671.
0070944124-2

To place your ad in Classifieds call:
Jitendra : 9967966093
Sanjeev: 9967552226
Vinay : 8451957053

जमीन विकणे आहे

जमीन विकणे आहे. शहापूर J n p ३ कॉरिडॉर हायवेटच कर्जतपासून 10 km 6 एकर ॲग्रीकल्चर टेबल लॅन्ड सर्व सोईयुक्त सिंगल ओनर. क्लिअर टायटल. 9822765505/ 8847744979.
0070972991-1

प्लॉट विक्रीविषयक

दोपोलीत सर्व सुविधांसह सीव्ह्यू NA प्लॉट्स १-२ BHK बंगलो, पाणी, लाईट, रोड, कंपाउंड, Wi-Fi, 7/12, बँकलोन मॉन्सून स्पेशल ऑफर सुरु ९५९५०१५०००, www.greatkonkan.com
0090377621-1

मालमत्ताविषयक

तात्काळ विकणे आहे. १४ गुंठे NA प्लॉट. हायवेपासून ५ किमी. गाव आंभण, मनोर, पालघर. मालक 9320312005.
0050268001-1

AGRICULTURE Plot Sale at Karjat Agricultural Plot 30000 Sq.ft. Rate 300/- Per Sq.ft. Available for Sale. Complete Tar fencing, Main Entrance Gate, single Owner. Ideal For Resort, Farmhouse, Home Stay, Etc. Contact: 9821114355/ 9321807605.
0070972030-1

वसई (पश्चिम) स्टेशनपासून १३ कि.मी. अंतरावर व बीचपासून ३०० मीटर अंतरावर ६ गुंठे प्लॉट, असेसमेंट व बोअरवेलसह उपलब्ध. संपर्क- ७०६६६५२५२८.
0070973052-1

लीज ॲण्ड रेंट

दादरस्थित लाघवी, प्रेमळ, उच्चशिक्